(2)


# उपवनसंरक्षक गडचिरोली वनविभाग, गडचिरोली यांचे कार्यालय.

"वनभावन" पोटेगांव रोड, तह. जिल्हा गडचिरोली. पिन ४४२ ६०५

फोन नं. ०७१३२/२३२०३६ फॅक्स नं. ०७१३२/२३२२६६

e-mail : dycfgadchiroli२०१४@gmail.com


विषय :- वनजमिन गडचिरोली

पोलीस अधिक्षक गडचिरोली यांना पोलीस मदत केंद्राच्या उपकेंद्रासाठी मौजा कटेझरी ता.धानोरा जि.गडचिरोली येथील 2.00 हे. संरक्षीत वनजमीन वन (संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वळती करणेबाबत

क्रमांक कक्ष 3(15)/सर्व्हे/ 1566

गडचिरोली, दिनांक 12 DEC 2017

प्रती,

पोलीस अधिक्षक

गडचिरोली

संदर्भ :- 1) महाराष्ट शासन महसुन व वनविभाग मंत्रलय मुंबई पत्र क्र. FLD-2017/प्र.क्र.383/फ-10 दिनांक 18.11.2017

2) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी म.रा. नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष 17/नोसेल/1 10/12458/2029 दिनांक 28.11.2017

CB-II/C

--------x--------

INWARD
S. P. ...
14 DEC 2017
19243

शासनाकडील उपरेक्त संदर्भिय पत्रान्वये कटेझरी येथील पोलीस मदत केंद्राचे 2.00 हे. प्रस्तावास वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत अट क्र. 1 ते 6 अन्वये तत्वत: मान्यता प्रदान केलेली आहे. सदर पत्राची प्रत यासोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.

तरी, शासनाकडील पत्रात नमुद अटीनुसार पुर्तता करुन पुर्तता अहवाल आग्ल भाषेतं (English) त्वरीत सादर करावा.

1) अट क्रमांक 1,2,5,6 बाबत हमीपत्र (under taking) सादर करावे.
2) अट क्रमांक 3 अन्वये N.P.V. ची रक्कम भरणा करावयाची आहे. या अनुषंगाने मंजूर असलेल्या प्रस्तावामध्ये नमुद केल्या प्रमाणे प्रस्तावित क्षेत्राकरीता 803000/- प्रती हेक्टरी याप्रमाणे 2.00 हेक्टर क्षेत्राकरीता 1606000/- (Rs. Sixteen Lakes Six thousand only) सदर रक्कमेचा भरणा, e-Payment Portal व्दारे खालीलप्रमाणे करावा.
   1) Name of Bank :- Corporation Bank, Lodhi Complex, New Delhi, 110003
   2) IFSC Code :- CORP0000371
   3) Account No. :- 0371001010-25218

62
14-12-17

E:\Survey\Janeral.doc

3) अट क्रमांक 4 अन्वये प्रस्तावित क्षेत्रातील 168 वृक्षाची तोड करण्याकरीता वृक्ष तोडी करीता लागणारा खर्च आपणास भरणा करावयाचा आहे. याबाबत तुर्तास वृक्ष तोडीकरीता लागणा-या रक्कमेचा भरणा करण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र सादर करावे.

सदर प्रकरणी प्रकल्पाची कामे करण्याकरीता ज्या वृक्षाची तोड करावयाची आहे त्याकरीता आपले विभागातील जबाबदार अधिका-यास वनपरिक्षेत्र अधिकारी पूर्व मुरुमगाव यांचेकडे संयुक्त सर्व्हेक्षणाकरीता पाठविण्यात यावे. जेणे करुन ज्या वृक्षाची तोड करावयाची आहे त्याची यादी तयार करुन लागणा-या खर्चाबाबत आपणास कळविण्यात येईल.

वरीलप्रमाणे पुर्तता करुन अटनिहाय पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. प्रस्तुत अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकल्पाला अंतीम मान्यता मिळण्याबाबत शासनाकडे अहवाल सादर करण्यात येईल. अंतिम मान्यता मिळाल्याशिवाय प्रकल्पाची कामे करता येणार नाही.

सहपत्रः- वरीलप्रमाणे

उपवनसंरक्षक, गडचिरोली
यांचे कडून मुळ प्रत अनुमोदित

उपवनसंरक्षक
गडचिरोली वनविभाग
गडचिरोली

**प्रतिलिपी :-** मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.

**प्रतिलिपी :-** जिल्हाधिकारी गडचिरोली यांना माहितीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी :-** सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू) यांना माहितीस अग्रेषित.

**प्रतिलिपी :-** व.प.अ. (प्रा.) पूर्व मुरुमगांव यांना माहिती व पुढील कार्यवाहीस अग्रेषित.